
श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ, आर्णी द्वारा संचालित

# स्व.राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी, जि. यवतमाळ


















# परिमल

## वार्षिकांक २०२२-२३



राष्ट्रीय परिषद उद्‌घाटन



अभ्यास मंडळ उद्‌घाटन



कार्यशाळा इंग्रजी, मराठी भाषा मंडळ





विज्ञान शाखा परिसंवाद



विद्यापीठ अविष्कार प्रतियोगिता

## संस्थेचे शिल्पकार



**स्व. राजकमलजी भारती**
४ जुलै १९२९ – ३१ मार्च २०००



**मातोश्री स्व. सुशिलाबाई रा. भारती**
मृत्यु ३१/१०/२०१८

## प्रेरणास्थान




**स्व. संजयजी रा. भारती**
माजी अध्यक्ष
श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ, आर्णी

# परिमल वार्षिकांक संपादक मंडळ



डॉ. शशिकांत वानखडे



प्रा. मिलींद पांडे



प्रा. अरविंद चव्हाण



डॉ. मनोज काकपुरे

तरुणाईच्या मनातील स्पंदने जपणारा, त्यांना शब्दरूप देणारा परिमल २०२२-२३ हा वार्षिकांक विविध विषयांवर भाष्य करणारा आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा, मोबाईलचा वापर ही काळाची गरज असली तरी त्याचा गैरवापर नको, महिला सक्षमीकरण, मैत्र, सामाजिक प्रश्न यावर महाविद्यालयीन युवक युवतींनी त्यांची रोखठोक मते व्यक्त केली आहेत. विशेष म्हणजे लोकसंस्कृती व स्थानिक बोलीभाषा यावरही भाष्य केले गेले आहे. सन २०२२-२३ च्या परिमल वार्षिकांकाची निर्मिती करण्याचं कार्य पूर्णत्वास नेतांना आम्हाला अतीव आनंद होतो आहे. लेखक, लेखिका, कवी, कवियत्रींच्या विविध विषयांवरील लेख , काव्य, मनोरंजन या साहित्यप्रकारांनी परीमालचा हा अंक सजला आहे.त्याबद्दल ते कौतुकास पात्र आहेत.

या वार्षिकांकाची निर्मिती करतांना श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या अध्यक्ष डॉ.किरणताई एस.भारती यांचे मार्गदर्शन व सचिव ॲड. सिद्धार्थ भारती यांचे प्रोत्साहन लाभले. स्व. राजकमलजी भारती कला,वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई भारती विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.निवृत्ती एन. पिस्तुलकर यांचे अमुल्य मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने परिमल वार्षिकांक निर्मितीचे काम पूर्णत्वास जावू शकले. या वार्षिकांकाची सुबक निर्मिती चिंतामणी कार्ड्स चे संचालक श्री गौतम छल्लाणी यांनी वेळेत करुन दिली, तसेच या अंकाची डीटीपी व छपाई सुरेश शेलारे यांनी केली. मुखपृष्ठ व रंगीत पान निर्मितीचे काम गुरुवर्य ग्राफीक्सचे संचालक गणेश जुमनाके यांनी केले.संपादक मंडळ त्याबद्दल त्यांचे आभारी आहे

**संपादक मंडळ**

परिमल वार्षिकांक

स्व. राजकमलजी भारती कला,वाणिज्य व

श्रीमती सुशीलाबाई भारती विज्ञान महाविद्यालय,

आर्णी,जि. यवतमाळ

मार्गदर्शक



**डॉ. किरणताई सं. भारती**

अध्यक्ष
श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ,
आर्णी



**ॲड.श्री सिध्दार्थ एस. भारती**

सचिव
श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ,
आर्णी

## प्राचार्यांचे मनोगत...



प्राचार्य
**डॉ. निवृत्ती पिस्तुलकर**

देशाच्या विकास वाटेवरील पथिक म्हणजे महाविद्यालयीन तरुण होय. आजचा तरुणवर्ग भारतापुढील आव्हानांना समस्यांना कोणत्या दृष्टीकोनातून पाहतो, या आव्हानांना समस्यांना सोडवण्याचे सकारात्मक उत्तर त्याचे जवळ आहे का ? या बाबत तरुणांचे विचार जाणून घेणे अत्यावश्यक झाले आहे. महाविद्यालयातून प्रकाशित होणारे वार्षिकांक हे तरुणांचे विचार समाजासमोर आणणारे उत्कृष्ट माध्यम आहे. महाविद्यालयीन युवक युवतींच्या आकांक्षांना, भावनांना शब्दरूप देण्यात आमच्या महाविद्यालयाच्या परिमल या वार्षिकांकाचे मोठे योगदान आहे. या नवसाहित्यिकांनी विविध विषयांना स्पर्श करीत २०२२-२३ या वार्षिकांकात आपले विचार मांडले आहेत. त्यांचे विचार संपादित करून प्रकाशित करणाऱ्या संपादक मंडळाचे अभिनंदन.

**-प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तुलकर**

# *Vision And Mission of the college*

## Vision

*The vision of our institution reflects from the watchwords which broadly implies grope ion ignorance and guides them towards the right path of bright future. Knowledge secured by education helps forever and makes possible to attain even the most impossible things like ambrosia.*

## Mission

*The mission of the institution is to raise academic,sacian and cultural standard of the students from rural and tribal area and to bring them in the main stream of education and help them in their overall development.*

(स्थापना-१९३२)

****

## * संचालक मंडळ *

| | | |
|---|---|---|
| डॉ. किरणताई सं. भारती | - | अध्यक्ष |
| श्री. समृध्द सं. भारती | - | उपाध्यक्ष |
| श्री. प्रियदर्शन रा. भारती | - | कोषाध्यक्ष |
| ॲड. सिध्दार्थ सं.भारती | - | सचिव |
| श्री. मनोज पां. माहुरे | - | सहसचिव |
| सौ. आशाताई प्रि. भारती | - | सदस्य |
| कु. नुतन रा. भारती | - | सदस्य |
| श्री. गिरिधरलाल छ. राठी | - | सदस्य |
| डॉ. शशिकांत व. वानखडे | - | सदस्य |

## * श्री. दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ, आर्णी द्वारा संचालित शिक्षण संस्था *

* स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य, व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी
* श्री. म. द. भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आर्णी
* श्री. म. द. भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आर्णी
* श्री. म. द. भारती माध्यमिक विद्यालय, गांधी नगर आर्णी
* श्री. म. द. भारती प्राथमिक विद्यालय, गांधी नगर आर्णी
* श्री. म. द. भारती मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, आर्णी
* श्री. म. द. भारती मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह, आर्णी



# स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी जि. यवतमाळ

## * शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी *

१) प्राचार्य डॉ.एन.ए.पिस्तुलकर
२) प्रा.कु.जे.आर.खोब्रागडे
३) प्रा.डॉ.एस.व्ही.वानखडे ग्रंथपाल)
४) प्रा.एस.बी.चोरडिया शा.शि.सं.
५) प्रा.डॉ.व्ही.आर.माहुरे
६) प्रा.एस.एन.बोळे
७) प्रा.एम.एम.पांडे
८) प्रा.यु.डी.चव्हाण
९) प्रा.डॉ.बी.एस.शेलकर
१०) प्रा.व्ही.आर.टोकसे
११) प्रा.डॉ.पी.जे.आवते
१२) प्रा.एस.एम.अराडे
१३) प्रा.डॉ.एम.आर.काकपुरे
१४) प्रा.पी.आर.भोकरे
१५) प्रा.डॉ.कु.आर.पी.टेकाडे
१६) प्रा.डॉ.पी.एम.वानखडे
१७) प्रा.डॉ.डी.पी.देशमुख
१८) प्रा.डॉ. यु.ए.मोरे
१९) प्रा.पी.एन.सोनोने
२०) प्रा.डॉ.जे.एस.कौसल्य
२१) प्रा.ए.एस.मुनेश्वर
२२) प्रा.ए.एम. बागडे
२३) श्री.एस.एच.जाधव (व.लिपीक)
२४) श्री.आर.एच.पवार (क.लिपीक)
२५) श्री.एस.व्ही.शिंदे (शिपाई)
२६) श्री.पी.वाय.पाटील (ग्रं. परिचर)
२७) श्री.एस.के.कोकेवार (शिपाई)
२८) श्री.ए.एम.पिल्लेवार (शिपाई)
२९) श्री.डी.यु.वाडेकर (शिपाई)
३०) श्री.एस.पी.ढाकुलकर (प्र.सहा.)
३१) श्री.व्ही.आर.ठाकूर (प्र.परिचर)
३२) श्री. एस.बी. वानखडे (प्र.परिचर)
३३) श्री.एन.के.लावरे प्र.परिचर)

# -: अनुक्रमणिका :-

परिमल २०२३-२४

-: मराठी विभाग :-


| | | | |
|---|---|---|---|
| १) | महाविद्यालयीन जीवन ही पुढील आयुष्याची शिदोरी | ओम सुनील राठोड | बी.ए. ३ |
| २) | विद्यार्थ्यांची बदलती मानसिकता | जय सुनील राठोड | बी.ए. २ |
| ३) | व्यसनाधिनता | प्रणव बी. जाधव | बी.ए. २ |
| ४) | खरच कलियुग आल वाटतेय | संकेत हर्सुलकर | बी.एस.सी. ३ |
| ५) | आयुष्य | पंकज जाधव | बी.ए. २ |
| ६) | अवकाळी पाऊस | जय सुनील राठोड | बी.ए. २ |
| ७) | निसर्ग नाद | | |
| ८) | जीवनाचे मोल | रोशनी एल.बर्डे | बी.ए. १ |
| ९) | संत श्री. सेवालाल महाराज | उर्वशी पी. जाधव | बी.ए. १ |
| १०) | दोस्ती | वैष्णवी किसन पठाडे | बी.ए. १ |
| ११) | भ्रमणध्वनी आणि आपण | निकिता ढवळे | बी.कॉम. २ |
| १२) | मोबाईलचा अति वापर तरुणाईचा ऱ्हास | कल्याणी पी. वानखडे | |
| १३) | माणसाने बोलून मोकळं व्हावं | अन्वर जे. शेख | बी.कॉम |
| १४) | दैनंदिन जीवनात मोबाईलचा प्रभाव | गुंजन भीमराव कांबळे | बी.ए. २ |
| १५) | स्वप्न यशाचे पहिले पाऊल | महेक खान | बी.कॉम.२ |
| १६) | बंजारा समाज व संस्कृती | अभय वि. राठोड | बी.एस.सी. २ |
| १६) | शेतकरी आत्महत्या | साक्षी एस.पाटील | बी.कॉम. २ |
| १८) | कॉलेजचा पहिला दिवस | अक्षदा ए. राठोड | बी.ए. १ |
| १९) | स्त्री | उर्वशी पी. जाधव | बी.ए. १ |
| २०) | मी मुलगी बोलते / गुरु/ कन्या भ्रूणहत्या | करीना एस. राठोड | बी.ए. २ |
| २१) | शेतकरी | आचल बी. डूबुरकार | बी.ए. १ |
| २२) | गर्भातील मुलीचे मनोगत | वैष्णवी आर. पहुळ | बी.कॉम. २ |
| २३) | लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी | कल्याणी दारासिंग जाधव | बी.ए. २ |
| २४) | मराठी भाषा संवर्धन काळाची गरज | वैष्णवी अशोक काळे | बी.ए.१ |
| २५) | मराठी भाषेची जोपासना | कु. संजना एस. खाडे | बी.ए. १ |
| २६) | माय माउली मराठी | गायत्री सुभाष कापसे | बी.कॉम. १ |
| २७) | अभिजात मराठी भाषा | योगेश वि. डायणे | बी.ए. १ |




-: हिंदी विभाग :-


| | | | |
|---|---|---|---|
| २८) | गुलझार हिंदी साहित्य के मनमौजी | वैशाली एस. राठोड | बी.ए. ३ |
| २९) | नारी | अंकुश वनवे | बी.कॉम. |
| ३०) | महिला सुरक्षा गंभीर समस्या | | |
| ३१) | सोहर | सुनयना ए. केसार्वानी | बी.कॉम २ |
| ३२) | बिछडे तो ना जी पायेंगे | वैष्णवी आर. माळोदे | बी.कॉम. २ |


-: इंग्रजी विभाग :-


| | | | |
|---|---|---|---|
| ३३) | Goran Ballavac | Heha Rathod | B.Sc. 3 |
| ३४) | Maria Lumbreas | Jagruti Kauslkar | B.Sc. 3 |
| ३५) | Marsdenia Chirndensis | Vaibhavi Gurgude | B.Sc. 3 |
| ३६) | Firework flower | Neha Lohakare | B.Sc. 3 |
| ३५) | Abelardo Yorge Dela Vega | Shejal A. Jadhao | B.Sc. 3 |
| ३८) | Jeron Bakker Dharti | P. Ratne | B.Sc. 3 |
| ३९) | Goran Bekavac | Sakshi H.Mundwaik | B.Sc. 3 |
| ४०) | Village Life | Madhuri V. Chavan | B.A. 1 |
| ४१) | The Life | Pranav B. Jadhao | B.A. 2 |


स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी जि. यवतमाळ

# मराठी विभाग

# महाविद्यालयीन जीवन ही पुढील आयुष्याची शिदोरी



**ओम सुनील राठोड**
**बी. ए. ३**

जन्मानंतर लगेच आयुष्यामध्ये स्पर्धा निर्माण होते. आरोग्य व संतुलन ठेवण्यासाठी आपली आई आपल्याला कोणत्या प्रकारचा रोग होवू नये म्हणून झटत असते आणि या सर्वांमध्ये आपली भूमिका जरी छोटी असली तरी काही स्पर्धांना तोंड देतादेता कधी आपले बालपण जाते हे आपल्याला कळत नाही. जेव्हा आपण बालपणातून थोडे मोठे होतो, तेव्हा आपल्यावर शालेय जिवनाचा भार येतो, आणि त्यानंतर आपन त्या शालेय आयुष्यामध्ये रममाण होतो, कधी आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण होते हे आपल्याला कळत सुध्दा नाही, जेव्हा आपण आयुष्याला समजायला लागतो तेव्हा आपल्यावर माध्यमिक शिक्षणाचा ताण येतो, या वेळी आपण त्या मध्ये रममाण होतो, आपल्याला दुःख वेदना त्या तेवढ्या मात्र जाणवत नाही. परंतु घरातील हाल व घराची जाणीव मात्र येते, घराची जाणीव आल्यामुळे माझे घर हा विचार येतो. नक्कीच या सगळ्या गमती व थोडे विचार लहानस्या मेंदु मध्ये ये-जा करतात. माध्यमिक शिक्षण काही सिध्द करण्यासाठी नव्हे तर हे जिवन जगण्यासाठी व जिवनातली संकटे दुर करण्यासाठी असतात, त्याची त्याला कल्पना नसते आणि तो आपले शालेयशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याला जिवनातील ध्येय दिसायला लागते, आणि आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी तो उच्च माध्यमिक शिक्षणास सुरुवात करतो, जेव्हा त्याला काही घरातील बंधने असतात, त्याला आपली गुणवत्ता या स्पर्धे च्या आयुष्यामध्ये सिध्द करायची असते. आणि ती सिध्द करण्यासाठी तो अहोरात्र कष्ट करतो. त्यानंतर त्याच्या खाद्यांवर थोडे घराचे ओझे येते. त्यानंतरही तो आपली गुणवत्ता सिध्द करण्यासाठी नेहमी झटत असतो, त्यानंतर जिवनाला कलाटणी देणारे व्यासपीठ म्हणजे महाविद्यालयीन जिवन या तीन वर्षामध्ये त्याला अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. आपली गुणवत्ता सिध्द करायची असते. महाविद्यालयीन जिवनामध्ये आल्यानंतर घराचे कोणत्याही प्रकारचे बंधन नसते, आणि त्यामुळे जिवन जगत असतांना चांगले विचार आणि चांगले आचार घेणे महत्त्वाचे असते. आपण आपल्या जिवनातील ४ टप्पे पूर्ण केली म्हणजे १. बालपण २. प्राथमिक शिक्षणक ३. माध्यमिक शिक्षण ४. उच्च माध्यमिक शिक्षण हे ४ टप्पे आपल्या पूर्ण आयुष्याचे सार राहते, त्यामुळे १ आई, वडील, शिक्षक या तीन लोकांमुळे आपल्याला आपली ध्येय निश्चित करता येतात, पंरतु जेव्हा आपण हे ४ टप्पे ओलाडल्यानंतर स्वतंत्र आणि मुक्त होतो, कोणाचे ऐकायचे नाही, समजून घ्यायचे नाही, कोणाला मान, कोणाच्या बद्दल आदर नाही, हे सगळे करत असतांना आपन स्वतःला हुशार समजतो आणि आता आपण परिपूर्ण झालो आहोत असे समझतो आणि स्वतःचे ध्येय स्वताः निश्चित करतो आणि स्वतः निर्णय घेतो हे चुकीचे आहे, आपण शालेय जिवनात जरी थोडे हुशार असू पण शिक्षकाचे व आई वडिलांचे मान राखणे हे आपले काम नाही तर कर्तव्य आहे. जरी आपण कितीही शिकून मोठे झालो तरी सुध्दा आपल्याला विद्यार्थी प्रमाणे जिवन जगावे लागते, हे विसरु नका आपण कितीही शिकून कोणत्याही पदावर गेलात तरी ही आपल्याला मार्गदर्शन करणारी व्यक्ती असतातच. हे गुरुची भूमिका बजावतात, म्हणून शिक्षण शिकून दाखवण्यासाठी नाही, दुसऱ्यांना हिणवण्यासाठी नाही, सिध्द करून दाखवण्यासाठी नाही. तर शिक्षण ध्येय पूर्ण करण्यासाठी व आई वडिलांची सेवा करण्यासाठी शिका हे शिक्षणाचे खरे महत्त्व. ज्याने शिक्षणाला निरोप दिला. त्याने स्वतःचे संकटे ओढ्वून घेतली म्हणण्याला काही हरकत नाही. म्हणून शालेय निरोप हा नव्हे शेवटचा प्रारंभ नव्या आयुष्याचा हेच खरे आहे. मी एकच सांगेन कधीही आपल्यामधला विद्यार्थी संपूण देवू नका ज्याने जिवन जगता जगता भोगले दुःख अपार तरी सुध्दा सोडली नाही, शिक्षणाची कास.

धन्यवाद.... !


स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी जि. यवतमाळ

# विद्यार्थ्यांची बदलती मानसिकता



जय सुनील राठोड
बी. ए. २

विद्यार्थी जिवनात असतांना विद्यार्थीची मानसिकता कशी आहे, हे आपण मांडण्याचा प्रयत्न करणार आहोत आणि त्यांची मानसिकता कोणत्याथराला गेली ही सुध्दा बाब आपन येथे मांडणार आहोत. विद्यार्थी जिवनात अनेक निर्णय विद्यार्थी घेत असतांना आता महाविद्यालय जिवनामध्ये शैक्षणिक व्यवस्था ही स्पर्धेचे जग असल्यामुळे त्या मध्ये टिकणे अतिशय महत्त्वाचे आहे. पण जेव्हा विद्यार्थी महाविद्यालय जिवनामध्ये जातेत तेव्हा त्यांची मानसिकता चांगली की वाईट यांची माहिती आपण सांगू शकत नाही पण काही वर्ष पूर्ण पुर्ती विद्यार्थी शिक्षण म्हणजे जिवन जगण्याचे आणिजिवनामध्ये मान सन्मान सुध्दा व त्या शिक्षणामध्ये सामाजिक सुधारणेसाठी उपयोग करायचे. परंतु आतामान सन्मान आई वडिलांची सेवा त्यांच्या शब्दांग होणार देणे सगळे बंद झाले त्याचे महत्त्वाचे कारण लहान वयात जडलेले वाईट व्यसने व त्यांच्या आजूबाजूतील परिसर हे सुध्दा खूप महत्त्वाचे आहे आज विद्यार्थी ची मानसिकता बदलली आहे. आज आपन पाहतो की महाविद्यालीयन जिवनामध्ये जेव्हा असताना तेव्हा विद्यार्थी शिक्षकांना सुध्दा आपल्यापेक्षा कमी समजतात व त्यांचा मान तर सोडा पण त्यांचा तान वाढवतात, ही बदललेली मानसिकता आज वाढत्या अत्याधुनिक वस्तु व अत्याधुनिक यंत्रामुळे झाले असे मला वाटते.

स्वप्नाच्या सोईसाठी पैशासाठी अनेक उद्योग उभारले जातात त्या उद्योगामुळे अनेक वाईट वस्तुची निर्मिती केली जाते. व ते मोठ्या प्रमाणात विकल्या जाते. हे गुटखा सिगारेट व अनेक वाईट वस्तु सेवन केल्याने त्याच्या मानसिकतेवर व वागणुकीवर परिणाम पडतो विद्यार्थी आपले जीवन जागण्यासाठी स्वतंत्र होतात व स्वत:च्या जिवनाचा तर नाश करतात परंतु दुसऱ्यांचा सुध्दा करतात. जर आपल्याला मुलांची मानसिकता वाईट व्यवसनाकडून शैक्षणिक धोरणाकडे व प्रगतीप्रथाकडे नेण्यासाठी सगळ्यांनी वैचारिक व समाजातील वाईट सवई बंद किंवा आळा घातला गेला पाहिजे एकाचे स्वार्थ परंतु सगळ्या भावी पिढीचे नुकसान नक्कीच होईल. या कारणाने आज विद्यार्थीची मानसिकता बदललेली आहे. व सुशिक्षित विद्यार्थी राहतील तर घराचे नाही तर समाजाचे व देशाचे सुध्दा नक्कीच भाग्योदय होणार हे निश्चित .

# व्यसनाने होतो घात व्यसनाधिनता...



प्रणव भोजराज जाधव
बी. ए. २

आयुष्य फक्त सतत बदलत असत. आज मी घरातून बाहेर निघालो तेव्हा बघितलं की आज काही दोन-तीन माणसे दारुच्या भट्टीत गेले आणि ते दारु पिवून बाहेर आले. दारु हे जीवनाला बिघडवणारे असते आयुष्यात खूप काही केले पाहिजे पण व्यसन हा फार भयानक असते. त्या दोन तीन माणसात माझे बाबा पणहोते. माझ्या बाबांना दारुचे व्यसन आहे हे व्यसन फार भयानक असते. या व्यसनात माणूस अडकलाकी तो बाहेर निघू शकत नाही. कोणताही माणूस कुठे जरी फसला तो निघू शकतो पण या व्यसनामधून सुटने फारच कठीण आहे.

माझे बाबा त्या दिवशी घरी आले आणि त्या दिवशी ते पूर्ण बदलून होते कारण त्यांच्यासोबत बोलण्याची सुध्दा भिती वाटत होती. माझी बहिण, भाउ, सुध्दा दादाला घाबरत होते. माझ्या बाबांनी माझ्या आईला माराला सुरुवात केली आणि माझी आई बाहेर गेली आणि थोड्या वेळेनंतर माझ्या बाबाची दारु उतरली. थोड्या वेळेनंतर माझी आई आम्ही सर्व घरी आलो कारण माझ्या बाबाची संपूर्ण दारु उतरली होती. बाबा दारु पिवून असला की आम्ही कुणीच घरी राहत नाही. कारण माझे बाबा हा सर्वांना मारतो. मला माझ्या आईला आणि बहिणीला दारु कुणीच पिवू नका आणि हे व्यसन लावू नका अशी माझी सर्वच लोकांना विनंती आहे. हे माझ्या सोबत रोजच घडते आणि याच्यावर माझ्या आजोबा, मामांनी सर्व दवाखाने आणि साधुसंताजवळ जावून थकले.



# खरच कलीयुग आलं वाटतय !



संकेत गजानन हरसुलकर
बी. एससी. ३

रोज रोज या घटना ऐकूण मन गहिवरते, हृदय दाटते
खरच, कलीयुग आलय की काय असच वाटते....

केव्हा पर्यंत स्त्रिया स्वत:ला पडद्याआड जपणार
नराधमांच्या डोळा कधी झापड बसणार
पदर नसला तिला तरी आदर डोळ्यात पाहिजे असते
मन गहिवरते, हृदय दाटते,
खरच, कलीयुग आलय की काय असच वाटते.....

केव्हा पर्यंत स्त्रिया ७ च्या आत घरी येणार
केव्हा पर्यंत स्वप्नांना तिच्या ७ चीच लक्ष्मणरेषा असणार
रेषेबाहेरील रावण केव्हा गजाआड फसणार,
अहो स्वप्नातला मृगजळ तिलाही गाठायचा असतो
मन गहिवरते, हृदय दाटते
खरच, कलीयुग आलय की, काय असच वाटते ......

कधी पर्यंत भारतातला शकुणी असाच डाव रचणार
कधी पर्यंत दु:शासन तिची लाज भऱ्या दरबारात खेचणार
आंधळ्या त्या मुर्तीला कधी डोळे फुटणार
का आपला समाज असहाय्य भिष्म बनुन बसते
मन गहिवरते, हृदय दाटते,
खरच, कलीयुग आलय की काय असच वाटते.......
निवडणूकीसाठी न्यायालय अर्ध्या रात्रीही उघडते
पीडित अबलेला मात्र पुढची तारीखच मिळते
कधी पर्यंत ती डोळ्यातले खारट अश्रुच पिणार
फासावर लटकलेला पाहून नराधमाला
तिलाही तिची तहान गोड करायची असते
मन गहिवरते, हृदय दाटते
खरच, कलीयुग आलय की काय असच वाटते....

निर्भया, कोपर्डी, साकीनाका बस !
बस आता सहन नाही करायचं
वेळ आलीय आता
मेणबत्तीच्या संथ ज्योती पेक्षा
मशालीची धगधगती ज्वाला पेटवण्याची
महाराणी लक्ष्मीबाईचा इतिहास आठवण्याची
पण, आता उठा स्त्रियांनो
हातात एका पेन आणि दुसऱ्या हातात घ्या तलवार
हात टाकता कोणीही तुझ्यावर कर त्याला ठार
कळूदे त्या नराधमालाही महाभारताचा सार
महाभारताचा सार !

# वाह रे राजअनिति

काल जे स्वच्छ होत आज ते काळे भासू लागले
निवडणुकीच्या प्रकाशात सगळेच दिसू लागले

इतक्या आंदोलनानंतर ही ज्यावर सरकार होते ठाम
फक्त चाहुलीने निवडणूकीच्या पडला तो मजबुत खांब

सगळच वाईट चांगल आणि चांगल वाईट होवून जात
जेव्हा समोर असते निवडणूकीची भिती
वाह रे राजअनिति
वाह रे राजअनिति .....

# आयुष्य



पंकज पुंडलिक जाधव
बी. ए. १

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही

हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद

धावधाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
हृदयाचे पाउल कधी
हृदयाकडे वळत नाही

इतकं जगून झालं पण
जगायला वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही

क्षण एक येईल असा
घेवून जाईल हा श्वास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास

अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या.

आयुष्य हे विधात्याच्या वहितील पान असतं
रिकाम तर रिकाम, लिहिलं तर छान असतं
शेवटचं पान मृत्यु अन पहिल पान जन्म असतं
मधली पाने आपणच भरायची कारण
ते आपलंच कर्म असतं
होणाऱ्या चुकांना टाळायचं असतं
कुठलंच पान कधी गाळायचं असतं
चूक झाली तरी काढून फेकायचं नसतं
कारण त्यातूनच आपल्याला कुठे शिकायचं असतं
जाती जपण्यात मजा आहे
बंध आयुष्याचे विणण्यात मजा आहे
जुळलेले सुर गाण्यात मजा आहे
येतांना एकटे असलो तरी
सर्वांचे होवून जाण्यात मजा आहे
नशीब कोणी दुसरं लिहित नसतं
आपण नशीब आपल्याच हाती असतं
येतांना काही आणायच नसतं
जातांना काही न्यायचं नसतं
मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असत
याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जन्माला यायचं असतं.
आहात तुम्ही सावरायला म्हणून पडायला आवडते
आहात तुम्ही हसवायला म्हणून रडायला आवडते
आहात तुम्ही समजवायला म्हणून चुकायला आवडते,
माझ्या आयुष्यात आहेत तुमच्यासारखे
सगळे म्हणून मला जगायला आवडते,
आयुष्य हे खुप सुंदर आहे.



# अवकाळी पाऊस



जय सुनिल राठोड
बी. ए. २

थेंब – थेंब पडला रे
गार गार हवेत
काय पाहून आला
राहिला आता तू
माझ्या शेतकऱ्याच्या
पोटावरती रे......

पाहिजे तेव्हा येत नाही
न आल्याने होते रे
शेती चा धिंगाणा
आणि पाहिजे नाही
तेव्हा सुध्दा करतो तू धिंगाणा रे

का दिसत नाही तुझ
तुला शेतकऱ्याचे पिक
घेवून करतो तू
शेतीच्या पिकाचा या नाश

कस जगायचं शेतकरी
आता सांग तुच रे देवा
काय खाऊन जगायच
या देशाचा अन्नदाता
उपाशी रे

उभ्या जगाचं पोशिंद्याला
करतो तु धिंगाणा
केली साल भर मेहनत त्याने
ना पाहली त्याने रात्र न दिवस

रात्र – रात्र जागला तो
इंचु साप सोबत
का? नाहि दिसत तुला
त्याची रे मेहनत
घेवून गेला तु त्याच्या
पोट–पाण्याचा रे घास

हिरवं – हिरवं पिक
आला रे तोंडाला
हिसकावला रे तु
त्याच्या तोंडातला घास

पावसाळ्यात ओढ रे
तु उन्हाळ्यात पडतो
पिकाचा तु त्याच्या नाश
रे करतो

---

# निसर्ग नाद

* ऐन सकाळी हिरवा साज ओढून
सृष्टीचे ते रुप वाटे स्वर्गानुरुप ।।

* नारळाची झाडे जणू उभी तासंतास
ओले दव तनी, मनी प्रेयसीचा भास ।।

* अन्, डोंगराच्या माथी सुर्यप्रकाश
शुभ्र धुक्याची जणू नभात रास ।।

* प्रफुल्लित रान सुगंधित सुवास
मकरंदाच्या पाकळ्यांवरुन हवेचा प्रवास ।।

* खळखळत्या झऱ्याचे ते सुरसाज
पक्षांचे किलबिलने गुंजताच नाद ।।

* कोकिळेचेही मधेच मधुर साद
निसर्गाचे हे सारे संगितमय नाद...

# जीवनाचे मोल



**रोशनी लक्ष्मण बरडे**
**बी. ए. १**

आयुष्य म्हणजे खेळ नव्हे
फुकट मिळालेला वेळ नव्हे

आयुष्य एक कोडं आहे
सोडवाल तितक थोडं आहे

आयुष्य खुप सुंदर आहे
त्याला हसुन जगा

म्हणून म्हणते आयुष्यात येवून
माणस मिळवावी.

एकमेकांची सुख दुःख
एकमेकांना कळवावी

पाहायला गेले ना तर
आयुष्य खुप सोप असते

जगायला गेले ना तर
दुःखातही सुख असते

वाटायला गेल ना तर
अश्रुतही समाधान असतं

अश्रु नसते ना या डोळ्यात
डोळे इतके सुंदर दिसलेच नसते

दुःख नसत ना हृदयात
तर धडकल्या हृदयाला काही
किंमत राहिलीच नसती

जर पूर्ण झाल्या असत्या
मनातील सर्व इच्छा

तर त्या वरच्या भगवंताची
सुध्दा किंमत कळाली नसती

कधी असही जगून बघा
एखाद्यावर विनोद करण्याआधी

त्याचा विचार तर करुन पहा
तर कधी कोणाच्या समाधानासाठी

न आवडलेल्या विनोदावर
सुध्दा हसुन पाहा

जोडली नाही मी जास्त नाती
तरी पण मनापासून जपते

आपल्या माणसांवर खुप प्रेम करते
आयुष्य थोडच असावं

पण आपल्या माणसांना
ओढ लावणार असावं

मैत्री अशी असावी की
स्वार्थाच भान नसावं

आयुष्य असही जगायच की
मृत्युनेही म्हटले पाहिजे

बाळा तू जगरे अजून
मी येईन नंतर !



# संत श्री सेवालाल महाराज



**उर्वशी पांडुरंग जाधव**
**बी. ए. १**

या सर्व जगात सर्वांनाच कोणाची न कोणाची गरज असतेच. कोणाला आई-वडिलांची तर कोणाला भाउ - बहिनींची तसेच आजी-आजोबांची या सर्वांची गरज असते.

पण या सर्व जगात सर्वांना समाज जीवन जगण्याचे खरा मार्ग दाखवणारे तसेच समाज कल्याण व समाजसुधाकर करण्यासाठी जन्मलेले असे बंजारा समाजाचे कुलदैवत संत श्री सेवालाल महाराज यांनी लोकांना समाजामध्ये वावरतांना जिवन जगण्याचे व मतभेद न करता आपुलकीने राहण्याचे दर्शन घडविले आहे.

संत श्री सेवालाल मारो दैवत
तोण पुजं कुणं कुणं ।।
तु अगर छी भाया
तारो नाम सेवा भाया ।।
जगेर र किदो सेवा
जय श्री... सेवा भाया ।।
पोहरा गडे रो रे भाया
सबेरो सेवा भाया ।।
कळेनी तारी माया
संत श्री सद्‌गुरु सेवा भाया ।।

# दोस्ती



**वैष्णवी किसन पठाडे**
**बी. ए.१**

निर्मळ आणि निखळ
एक ते नातं असतं,
जीवाला जीव ही देणारं
ते एक गणित असतं !

स्वच्छ आणि सुंदर
मनांच एक मिलन असतं,
हक्काच आणि आपुलकीचं
ते एक अलिंगन असतं !

रक्ताचं जरी नसलं
तरी ते आपलं असतं,
स्वच्छंदीपणाचं ते एक
रंगीत फुलपाखरु असत !

रुसवे आणि फुगवे
यांचही येणजान असतं,
पण अतुट बंधाच
ते एक रहस्य असंत !

वयाचं बंधन नसलेलं
हसरं एक नातं असतं,
दुःखात फौज होणारं
ते आपल्या गोड मेत्रीच
नात असतं. !

# भ्रमणध्वनी आणि आपण



निकिता राजेश ढळवे
बी.कॉम.२

आजच्या काळात सर्वच क्षेत्रातील तंत्रज्ञान फारच विकसित झालेले आहे. मोबाईलचा वापर करणे आपल्यावर अवलंबून असते. मोबाईलचे तंत्रज्ञान तर इतके वाढले आहे, की एक मोठी क्रांतीची सुरुवात झालेली जाणवते.

मोबाईलचे फायदे तसेच तोटे सुध्दा आहे. आपण मोबाईलचा कशा प्रकारे वापर करतो याच्यावरुन ठरते की, मोबाईलचा वापर योग्य आहे अयोग्य आहे आज प्रत्येकाच्या हाती मोबाईल आलेला आहे. घराघरातील प्रत्येक व्यक्तीजवळ मोबाईल पहावयास मिळत आहे.

मोबाईल फोनने आपल्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. मोबाईल फोन हा जगाच्या सध्याच्या सामाजीक आणि आर्थीक प्रगतीचा महत्त्वाचा मार्ग आहे. आज तर मोबाईल नसता तर आजचे हे युग आधुनिक युग म्हटले गेले नसते. कारण आजच्या आधुनिक युगाला परवर्तीत करण्यासाठी मोबाईलची महत्त्वाची भूमिका आहे. विकासाच्या मार्गावर आज सर्वच वस्तु डिजिटल झाल्या आहे. मोबाईल नसता तर डिजिटल क्रांती आणणे शक्य झाले नसते. कारण मोबाईलच्याच मदतीने पैशांची देवाण-घेवाण होते. मोबाईल नसता तर नातेवाईक, मित्र, व्यावसायीक लोकांना संपर्क करण्याचा वापर केला जातो. आजकाल सर्व वस्तू स्मार्टफोन मध्ये उपलब्ध आहे. मिळवणे शक्य होते. परंतु जर मोबाईल नसता तर जगात काय - काय नविन घडत आहे हे लक्षात आले नसते. ऑनलाई शॉपींग आज मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हे मोबाईलमुळेच शक्य झाले आहे. परंतु आज लोकांना अति मोबाईल वापराचे व्यसन जडत आहे. मोबाईलमध्ये दीर्घकाळ गेम खेळणे Short Video पाहणे, यामुळेच डोकेदुखी, डोळे दुखणे यासारख्या समस्या निर्माण झाल्या नसत्या.

मोबाईलच्या मदतीने वाईट बुध्दीची लोक हॅकिंग करुन लोकांची माहिती चोरतात व त्याचा चुकीचा वापर करतात. शास्त्रज्ञाचे मानने आहे की, फोन मधून निघणारे ऐडीएशन मानवी शरीराला हानीकारक असतात व दरवर्षी हजारो पक्ष्यांचा मृत्यु या एडीएशन मुळे होते. तर मोबाईल नसता तर अशा समस्या उद्भवल्या नसत्या. मोबाईल फोन सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजू आहे. मोबाईलमुळे लहान मुलांच्याच नाही तर मोठ्या माणसांच्या हालचाली कमी झाल्या यामुळे आळस हा वाढला.

शेवटी यावरुन एवढाच निष्कर्ष काढता येईल की, मोबाईल हा आवश्यक तर आहेच पण त्याचा वापर कामापुरताच केला पाहिजे.

'' आँगन में नीम और बरगद मुरझाने लगे है, लगता है घरके बच्चें अब मोबाईल चलाने लगे है ।''





# मोबाईलचा अतिवापर तरुणाईचा ऱ्हास



कल्याणी पांडुरंग वानखडे
बी.ए.३

२४ मार्च २०२० हा दिवस प्रत्येक भारतीय नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि अविस्मरणीय असा आहे, कारण याच दिवशी आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण भारतासाठी '' लॉकडाउन'' लावले होते. याच दिवसापासून काही दोन तीन महिन्यापर्यंत संपूर्ण देशांच ''कंपन्या, संस्था आणि दुकाने बंद करण्यात आपल्या होत्या. याचे कारण असे की '' कोरोना'' नावाचा रोग संसर्गजन्य असल्यामुळे जगभरातच पसरले होते. आणि जगभरात ''लॉक डाउन'' लावण्यात आले होते, तरी मात्र एक यंत्रणा चालूच होती की एवढ्या मोठ्या लॉकडाउन मध्ये सगळ्यांना जोळून होती आणि त्याच काळात मोबाईलचा सदुपयोग आणि दुरुपयोग आपल्याला कळाला.

कोरोना संसर्गामूळे संपूर्ण जगभरात कडक लॉकडाउन असल्याकारणाने संपूर्णदेश आणि जग हे मोबाईलच्याच आधारावर संगळ्यांशी जूळून होता. कारण सगळया विद्यापिठाच्या, महाविद्यालयाचे शाळेचे आणि स्पर्धा परीक्षा वाल्यांचे क्लासेस सर्व ऑनलाईन पध्दतीने शिकवत होते आणि कित्येकदा विश्वविद्यालयाचे परिक्षा हे ऑनलाईन स्वरुपाची घेण्यात आले हे झाली मोबाईलची सदुपयोगाची म्हणजेच मोबाईलची चांगली बाजू. तसेच तरुणांनी ह्या चांगल्या यंत्रणेचा खुप दुरुपयोग सुध्दा केलेला आहे, म्हणजेच जेव्हा विद्यापीठाचे संपूर्ण परीक्षा ही ऑनलाईन स्वरुपात होत होत्या तेव्हा विद्यार्थ्यांनी संगळ्या प्रश्नांचे उत्तर गुगल वरुन शोधून उत्तरे लिहीली आणि विद्यापिठांची परीक्षा उत्तीर्ण केल्या, असा दुरुपयोग करुन त्यांनी त्यांच्यात असलेल्या विद्यार्थ्यांची आत्महत्या केली.

मोबाईल हा आधुनिक काळाची गरज आहे, पण त्यांचा सदुपयोग झाला पाहिजे. पण सद्याची तरुण पिढी त्याचा सदुपयोग न करता त्यांचा दुरुपयोग आणि अतिवापर करत आहे. '' आचार्य चाणक्य यांनी म्हटले आहे, कोणत्याही गोष्टीचा अतिवापर केल्यास ते विषाच काम करते'' आणि आपण पाहतच आहोत सध्याची तरुण पिढी मोबाईल चा अतिवापर करत स्वत:चा भविष्याचा विनाश करत आहे. मोबाईल मध्ये असेलेले 'फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्एप आणि बेटेलीग्रा तसेच युट्युब यसारखाच एप्लीकेशनचा अतिवापर करुन अंगात असलेल्या व्यक्तिमत्व कौशल्याचा ऱ्हास करत आहे. आज दारिद्री, बेरोजगारी आणि सायबर क्राईम जास्तीत जास्त वाढत चालेलं आहे. याच सर्वात मोठ कारण म्हणजेच मोबाईलचा अतिवापर होय. आजचि तरुण पिढीचा दृष्टीकोण हा मोबाईल वर पैसे कमविण्यावर जास्तीत जास्त महत्त्व वाढत चालेल आहे.

यांचा दुष्परिणाम असा होत आहे, तरुण मुल मेहनती आणि संघर्ष करत नाही आहे, एक काळ असा होता की पुस्तकांच्या भरोष्यावर तरुण तरुण मुल कोणतीही अशक्य गोष्ट असलेली शक्य करुन दाखवत होती आणि पुस्तकावर जास्त अवलंबून असल्या कारणाने त्यांची स्मरणशक्ती सुध्दा मजबुत असे पण आजचा हा ऑनलाईन वाल्या अभ्यासामुळे आणि मोबाईलचा अतिवापरामुळे तरुण पिढीचा मेंदूचा सुध्दा ऱ्हास होत चाललेला आहे आणि माझा तरुण पिढीला सल्ला आहे, त्यांनी मोबाईलचा सदुपयोग करावा नाही तर तोच मोबाईल विषाच काम करु शकतो आणि भावी पिढीला बरबाद करु शकतो.

# दैनंदिन जीवनातील मोबाईलचा प्रभाव



**गुंजन भिमराव कांबळे**
**बी.ए. २**

मोबाईल फोन हे एक संवादाचे साधन आहे. मोबाईल फोन हा फोटोग्राफी , व्हीडीओ कॉलींग आणि संगीत यासारखे तांत्रिक वैशिष्ट्ये दर्शवितो.

सध्याच्या काळात तर मोबाईल इतका महत्त्वाचा झाला की ते आपल्या जीवनाचा एक अविभाज्य अंग बनला आहे. मोबाईल फोन दैनंदिन जीवनात लागणाऱ्या गरजा पुरवतो. आज तर त्यावर टी.व्ही. सुध्दा पाहता येते पण मोबाईलच्या सकारात्मक आणि तनकारात्मक या दोन्ही बाजू आहेत.

जेवढे फायदे मोबाईल वापरण्याचे आहेत तेवढेच नुकसान पण आहेत.

१. मोबाईल फोनमुळे मित्र, नातेवाईक यांना सहज संपर्क करु शकतो.
२. मोबाईल फोनवर टी.व्ही, चित्रपट सिनेमा पाहता येते.
३. विद्यार्थी मोबाईलचा वापर करुन अभ्यास करु शकतात.
४. मोबाईल मध्ये जीपीएस म्हणजे मोबाईलची लोकेशन आपण माहिती करु शकतो किंवा दुसऱ्या नीवन जागेबद्दल माहिती करु शकतो. आणखी बरेच उपयोग आहेत पण, त्याचे तोटे.

**नुकसान :-**

१. मोबाईल मुळे विद्यार्थ्यांचा बराच वेळ वाया जातो. त्यामुळे महत्त्वाचा वेळ वाया जातो. **Online games** ते खेळतात, सिनेमा पाहतात.
२. मोबाईलचा जास्त वापर केल्यामुळे आरोग्यावर परिणाम होतो. विद्यार्थी आरामाकडे दुर्लक्ष करतात त्यामुळे ताण येतो.
३. मोबाईलच वैशिष्ट्य आहे की, तो माणसाला माणसांशी जोडतो. पण, खरंतर मोबाईलमुळे लोकांमध्ये अंतर निर्माण झालं आहे.

त्यांचा वेळ जास्त मोबाईल संदेश पाठवण्यात जाते. **Social Media** चा वापर जास्त होतेय आणि वास्तव्यापेक्षा मोबाईलवर जास्त मित्र-मैत्रीणी व्हायला लागलेत.

सामाजिक एकटेपणा निर्माण होत चाललय. प्रत्यक्षात चार मित्रांत बसण्यापेक्षा हजारो मित्रांच्या संख्येमध्ये मोबाईलवर व्यस्त राहतात. त्यामुळे नाती दूरावत आहेत.

म्हणून या सर्वांचा तात्पर्य एकच निघते की, मोबाईलचा वापर किती वेळ करायच आणि त्याचा दुष्परिणाम होणार नाही याची सतत काळजी घ्यायची.

---

# माणसाने बोलून मोकळ व्हाव !



**अनवर जयनुल्ला शेख**
**बी. कॉम. १**

आपल्या मनासारख होत नसेल तर वेळेवर सोडून द्याव ।
इतरासारखे कधी मनाला समजून घ्यावं ।

विस्कटलेली नाती आणि विस्कटलेल्या आयुष्याला
नविन वहिच्या नविन पानारखा पहाव.

काल झालेल्या चुका-वाद कालच्या काल विसरुन जाव्या.
नशिबात जो मिळतो त्याला जपून ठेवाव.

कितीही असतील रुसवे तर ते आपल्या नात्यापेक्षा मोठे नसतात. आज आपण आहो तर उद्या नाही म्हणून माणसाने बोलून मोकळ व्हावं....



# स्वप्न यशाचे पहिले पाऊल....



**महेक खान**
**बी. कॉम १**

आपल्या भारताचे माजी राष्ट्रपती माननीय श्री.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे आपले पुस्तक प्रज्वलीत मने (इगनडिटेट माईड्स) मध्ये भारतीय तरुण पिढींना स्वप्ने पाहा हा संदेश दिलाआहे. खरेच त्यांच्या ह्या संदेशामध्ये कितपत सत्य आणि खरेपण पडलेला आहे? त्यांच्या ह्या संदेशाचा जाणीवपूर्ण अभ्यास केला तर आपल्याला दिसेल कि कोणतीही यशस्वी झालेली व्यक्ती ही म्हणत असते कि '' मी माझे स्वप्न पूर्ण केले '' किंवा '' माझ्या आई वडिलांचा स्वप्न पूर्ण केले.'' किंवा ''माझ्या आई- वडिलांचा स्वप्न आपल्याला कळेल कि ती यशस्वी पायरी चढण्याआधी त्याने संघर्ष केला त्याने संघर्ष कसा करायचा हा विचार केला असेल, आणि विचार करण्या अगोदर सर्वप्रथम त्याने तो स्वप्न पाहले असेल या सगळ्या गोष्टीचा जाणीवपूर्ण अभ्यास केल्यानंतर आपल्याला समजते की, थोर वैज्ञानिक मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांनी दिलेला संदेश तरुणांनो तुम्ही स्वप्ने पाहा.... कारण तुम्ही देशाचे भविष्य आहात '' खूप महत्वपूर्ण आणि देशाला सामाजिक आर्थिक दृष्ट्या मजबुत करा साठी म्हटले आहेत.

तरुणांनी स्वप्ने बघितले तर त्यांचे स्वप्न विचारामध्ये रुपांतरित होतात आणि त्यांचे विचार कृती मध्ये रुपांतरीत होते. मग कृती करत म्हणजेच संघर्ष करत तो यशाचा शिखर गाठतो म्हणूनच सर्वप्रथम तरुण पिढीने स्वप्ने पाहायला हवी. जर ते स्वप्नेच बघत नसेल तर त्यांना काही करण्यासाठी विचारच नाही येणार .... यश प्राप्तीचा पहिले पाऊल म्हणजेच स्वप्ने होय.

स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांनी जर रयतेसाठी 'हिंदवी स्वराज्य' या स्वप्नच पाहिले नसते तर आपल्याले स्वराज्य भेटले नसते आणि आपल्याला 'जाणता राजा' भेटला नसता. राजमातांचा स्वप्न छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले ध्येय ठरवून अठरा पगड जातीच्या स्वराज्य उभे करुन आपल्या मातेचे स्वप्न पूर्ण केले. म्हणजेच कोणत्याही यशाचा पहिले पाऊल म्हणजेच स्वप्न होय... आपल्या देशाच्या तरुण पिढीने स्वप्न पाहणे हेच आपल्या देशाचे भविष्यासाठी अत्यंत महत्वाचे आहे. पण सध्याची पिढी मोबाईलचा अतिवापर करत असल्यामुळे या जनरेशनची तरुण पिढीचे स्वप्न पाहणे आणि ते साकार करणे यावर काही जास्त लक्ष नसल्यामुळे वास्तवात असलेली तरुण पिढीमध्ये कामचोर पणा आणि काही मोठे करण्याची जिद्द आणि चिकाटी दिसत नाही आहे. म्हणून मी येणाऱ्या तरुण पिढीला सांगू इच्छिते की मोबाईलचा अतिवापर टाळून आपल्या देशासाठी प्राण अर्पण करणारे थोर पुरुषांचा इतिहास वाचून नविन स्वप्न पाहून ते सत्यात उतरविण्याची जिद्द अंगात मेंदुमध्ये आणि ह्रदयात आणावी.... !

सपने वो नाही जो निंद मे देखते हो
सपने तो वो है, जो आपको निंद ही न आने दे ।

# बंजारा समाज व संस्कृती




**अभय विलास राठोड**
**बी.एस्सी. २**


गोर बंजारा यांचा इतिहास हे खुप प्राचीन व खूप सुंदर आहे. राजस्थान वाळवंटातील मातीतल्या प्रत्येक कणात बंजाऱ्यांचा स्पर्श मिळेल. बंजाऱ्यांचे उगम घुमर परंपरा, पोषाख, वेशभुषा, राहण्याची दिनचर्या ही प्रत्येक बंजारीमध्ये समानच आहेत. बंजारा समाज हा भारतातील प्राचीन व्यापारी होते.

मुघलांच्या काळापासून तर इंग्रजी राजेशाही पर्यंत दळणवळणाचे कार्य केले. बंजारा समाजाचे व्यापार करण्याचे वाहन म्हणजे उंट, बैल, घोडे हे होते. त्यांच्यावर व्यापार करत असे. या ठिकाणारुन त्या ठिकाणावर जातांना जेथे पाण्याची व राहण्याची सोय असे तिथे थांबत असे, असे करता करता काही बंजारी नदी काठी, तलाव येथे स्थायी झाले व त्यांना तांडा असे म्हणण्यात आले. एक तांडा जवळपास दोन ते तीन हजार घरांचा असायचा. गावात गाय, बैल हे मोठ्या प्रमाणात असायचे. गोर म्हणजे गाईचे रक्षण करणारा समाज या समाजात क्षत्रीय सुध्दा जन्माला आले. आलाउद्दल, मिळू भुक्या, राणी झलकारी, सामत दादा ही क्षत्रीय लोक ज्यांनी समाजासाठी आपले प्राण दिले.

संत सेवालाल महाराजांनी समाजाला एक असा संदेश दिला. जान जो । छाळ जो । पचच माळजो ।
माणसाला परखल्याशिवाय त्याच्या वर विश्वास करु नये. त्याची बुध्दीमत्ता, निती, नियमती ओळखल्याशिवाय विश्वास करु नये व या गोष्टीमधुन निघाल्यानंतर त्याच्यावर विश्वास करावे असे संत सेवालाल महाराजांनी म्हटले आहेत. बापूंचे जन्म गाव कर्नाटक बुटी बिलारी (सेवागढ) म्हणून ओळखले जाते व त्यांची समाधी ही वाशिम जिल्ह्यात पोहरागढ येथे आहे.

भारतात काही काळानंतर लोकशाही प्रथा येवू लागली. बंजारी राजस्थान, कर्नाटक, महाराष्ट्र, आंधप्रदेश स्थायी झाले. त्या राज्यात त्यांना नविन नावाने ओळखले गेले. बंजारा गण असून त्यांना उपजाती दिल्या जसे की, वनजारी, बनजारी, बंजारी, बंजारा, लम्हाडा, लम्भाडी, लुभानी, ब्रिजवासी, लामडिया या नावाने ओळखले गेले. व या मध्ये एक महत्त्वाचा जोडण्यात आला म्हणजे लाखा बंजारा सिखांत बंजारा गण व बंजारा गण शिख हे मिसळत गेले. आजही नांदेड, पंजाब, यवतमाळ येथे शिख बंजारा मिळेल.

**बंजारा संस्कृती व संस्कार :-**

बाळ जन्माला आल्यापासून त्याला आपली संस्कृती व आपले संस्कार शिकवले जातात. बंजारा समाजाची संस्कृती ही त्यांच्या सण उत्सवामध्ये दिसून येते जसे की, तीज (जवारा) व होळी.

तीज ही दहा दिवसाची असते. ही तीज फक्त अविवाहीत मुर्लीसाठी असते. अशी मान्यता आहे की, तीज आता ही मुलींना भरपूर आशिर्वाद व सुखी जिवन देत असते. हा सण रक्षाबंधनापासून ते गोकुळ जन्माष्टमी पर्यंत असतो. होळी हासण पाच दिवस चालते. या वरील दोन्ही सणांमध्ये बंजारा समाजाची पारंपारिक तैंगी (गीत) व सांस्कृतिक नृत्य करुन मोठ्या प्रमाणात साजरा केले जातात.

होळी हे सण साजरा करतांना होळी सकाळी ४.०० ला जाळून साजराकेली जाते. नंतर रंगपंचमी साजरी करतात. रंगपंचमीचे रंग हे पळसांच्या फुलांपासून बनवलेले असतात. या समाजाचे गीत तांडेरो नायक घर छेनी, रंग लायोग कोणी ।
असे बोलून सण साजरा केले जातात.

हरित क्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक ज्यांनी समाजाच्या व राज्याच्या हितासाठी हरित क्रांती घडवून आणली. जवळपास ११ वर्षे मुख्यमंत्री पदावर होते व आता शिक्षण क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात व प्रगती पदावर बंजारा समाज आहे. राजकीय क्षेत्रात,संगीत क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगतीपथावर त्यामुळे बंजारा समाज हा पूर्णपणे सामाजिक आर्थिक, मानसिक क्षेत्रात समाजात मिसळून समाजाची प्रगती करत आहे. काही रुढी परंपराच्या बेड्या तोडल्यामुळे बंजारा समाज आजच्या युगात शिक्षणामुळे विकसित झाले आहेत.

वेशभूषा :- स्त्रियांसाठी - घागरा चोळी, अलंकार पायातील व हातातील चांदीचे कडे, आटी चोटला - डोक्यातील अलंकार व कानातील अलंकार, नाकातील भुरीया (नतनी) बायत्या (बाजुबंद प्रकार), छंद, कमरबंद.

पुरुष :- धोतर, कुर्ती, पगडी

हा समाज ही संस्कृती खचत जात आहे. त्यांना जपायचे आहे. प्रत्येक परंपरा ही वाईट नसते, आणि वाईट असलेली गोष्ट ही परंपरा नसते.

गोर बंजारा समाजाची संस्कृती ही सराहनीय आहेत. जय गोर । जय बंजारा.

---

# शेतकरी आत्महत्या




**साक्षी सुभाष पाटील**
**बी. कॉम २**


सकाळची कोवळी सूर्याची किरणे माझ्या डोळ्यांवर पडली तेवढ्यात एक सुंदर गोड आवाज माझ्या कानी पडला कि बाबा उठा आपल्याला कार्यक्रमाला जायला भरपूर वेळ होत आहे मी उठून तयारी केली आणि मी निघालो निरागत स्वप्नाच्या प्रवासाकडे मस्ती, मजा, मौज करत प्रवासाचे टप्पे गाठत होते. तेवढ्यातच आईचा आवाज आला आईने हाक मारली अरे बाळा उन्हाचे चटके लागल्यामुळे बाळाचा गळा सोकून आला तर एखादा झाडाखाली बैलगाडी थांबवून पाण्याचा घोट घेवू तेवढ्यातच न कळत माझा लक्षएका झाडाखाली गेले तर बघतो तर काय एक निराश शेतकरी झाडाला फास बांधलेला पाहता होता. (मला तर काहि वेळासाठी धक्काच बसला) मी त्या शेतकऱ्याकडे गेलो मी त्याला विचारल अरे बाबा कायकरत आहेस तु तेवढ्या तो उध्दट शब्दान म्हणाला तुला काय कळत रे पोरा फाशी मधल मी म्हटल त्याला तु माझ्यासोबत चल तो म्हणाला मी का येवू तुझ्या सोबत तर मि त्याली काही अटी घालून माझ्या सोबत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी नेलं आणि शेतकऱ्याच्या पत्नीने आणि मुलाने त्याची व्यथा सांगितली. आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याचा मुलगा म्हणतो का बाबाने आत्महत्या केली. तेव्हापासून एक टाईम सुध्दा अन्नाचा घास मिळत नाही. तिथंली अवस्था पाहून तो धावत सुटला आपल्या परिवाराकडे आणि परिवारासोबत असतांना त्याच्या मनात विचार आलाकी, जो मि निर्णय घेतला होता तो चुकीचा होता. जर आज मी त्या व्यक्ती सारखा निर्णय तर आज माझा पण परिवार त्याच अवस्थेत असता.

माझी एक कळकळीची विनंती आहे कि कोणत्याही शेतकऱ्यांनी आत्महत्या करु नये.

## कॉलेजचा पहिला दिवस



**कु. अक्षदा अनिल राठोड**
**बी. ए. १**

२०२० मध्ये मी श्री. म.द. भारती कन्या महाविद्यालय आर्णी या कॉलेजमधून नुकत्तच बारावी उत्तीर्ण केली होती आणि आता सिनीयर कॉलेजमध्ये जायची धडपड सुरु होती. पण आता ॲडमिशन घ्यायची तरी कुठे असा प्रश्न निर्माण झाला होता. माझे सगळ्या मैत्रीणी सांगत होत्या. इकडे ॲडमिशन घेवून तिकडे ॲडमिशन घेवू अशी चर्चा व्हायची. तेव्हा मला अमरावतीच्या व्ही.एम.व्ही. कॉलेजमध्ये ॲडमिशन घ्यायची होती. पण माझी तब्येत बरी राहत नसल्यामुळे माझे व्ही.एम.व्ही. मध्ये ॲडमिशन घ्यायचे स्वप्न स्वप्नच बनून राहले.

नंतर काही कारणास्तव एक वर्ष गॅप पडली. आर्णीच्या म्हणजे आपल्या Let R. Bharti Arts, Commerce & Smt. S.R. Bharti Science College मध्ये ॲडमिशन घेतले.

ऑगस्टला कॉलेज सुरु झाला व मी कॉलेज मध्ये गेली आणि तो माझा कॉलेजचा पहिला दिवस होता. कॉलेजच्या पहिल्या दिवशी मी थोडी घाबरलेली होती. कारण एक वर्षाचा माझा गॅप पडलेली होती. त्यामुळे माझे बारावीचे मित्र समोर गेलेले होते.

पहिल्या दिवस असल्यामुळे मी घरुन लवकर निघाली. ७.३० ला मी कॉलेजमध्ये पोहचली आणि बघीतले तर कॉलेज मध्ये कोणीच दिसत नव्हते. मी कॉलेजमध्ये एका झाडाखाली जावून बसली. कॉलेजचे शिपाई काका त्यांचे काम करत होते. त्या दिवशी मनात वेगवेगळे विचार येत होतं. मित्र कसे भेटतील सर कसे असेल अशी मनात भिती होती. थोड्या वेळानी एक- एक विद्यार्थी येवू लागले. पण मला माझ्या ओळखीचे कोणीच दिसत नव्हते आणि तेवढ्यात एक मुलगी माझ्या जवळ येवून बसली आणि माझ्या सोबत बोलू लागली. ती ताई 3rd Year ची आहे असे सांगितले. मी त्या ताईला B.A.I Year चा वर्ग कोठे बसतो हे विचारले त्या ताईने मला वरी हॉल मध्ये बसतो असे सांगितले. तिथून मी वरी हॉलकडे गेली आणि हॉल मध्ये काही मुल मुली बसून होते. लेक्चर चालू व्हायला वेळ होता म्हणून मी खाली आली मला खाली एक सर भेटले. सरांनी मला विचारले कि तु B.A.I Year ची विद्यार्थीनी आहे का तर मी हो सर म्हटले. मला स्पोर्ट मध्ये आवड असल्यामुळे मी सरांना स्पोर्टच्या सरांबद्दल विचारपुस केली. त्यांना भेटायच आहे असे सांगितले गमंत अशी कि मला सरांच नावच माहित नव्हते. सरांना सांगितले की मला स्पोर्ट टीचर सरांना भेटायच आहे. सरांनी मला म्हटले बर भेटशिल पण आता B.A.I वाल्यांचा लेक्चर सुरु होणार आहे आणि सरांनी मला त्यांच्या सोबत वरी हॉल मध्ये नेले. मी हॉलमध्ये जावून बसली. सरांनी वर्गात आधी त्यांच परिचय दिला कि मी स्पोर्ट चे सर आहे आणि हे ऐकताच मी माझ्या डोक्यावर हात ठेवला अरे बापरे ! हेच आहेत का स्पोर्टचे सर असे मनात बोलू लागली. सरांनी स्वत:चा परिचय देवून स्पोर्ट बद्दल वर्गात माहिती दिली आणि वर्गात सांगितले की, वर्गात येतांना मला एक मुलगी भेटली आणि सांगितले की, मला स्पोर्टच्या सरांना भेटायचे आहे म्हणून सरांनी एवढे सांगितले आणि हसायला लागले. सर माझ्या बद्दल बोलत आहे हे फक्त मलाच माहित होते व सर हसत - हसत वर्गाच्या बाहेर आले. मी सरांना Sorry म्हटले कि मला माहित नव्हते कि, स्पोर्टचे टीचर तुम्हीच आहात म्हणून असे सांगितले. सर पुन्हा हसू लागले. माझे टेन्शन कमी झाले.

आता स्पोर्टच टेन्शन संपल होतं. आता पुन्हा मैत्रीर्णीबद्दल विचार चालू होता. कारण कॉलेजचा अर्धा दिवस संपलेला होता आणि मला ओळखिचे कोणीच दिसत नव्हतं. मला खुप एकट - एकट वाटत होते. कॉलेज संपताच मी घरी आली आणि माझ्या ताईला सर्व सांगितले आणि जुन्या कॉलेजची आठवण काढून रडायला लागली.

जुन्या कॉलेज मध्ये माझ्या किती मैत्रीणी होत्या सगळे सर पण ओळखिचे होते. किती मजा यायची असे वाटत होते आणि ताईला सांगितले की मला या कॉलेजमध्ये मला जायच नाही. मग मला ताईनी सांगितले समजावले की, कॉलेजचा पहिला दिवस असाच असतो कोणीच ओळखीचे राहत नाही. सगळे अनओळखीच राहतात. हळू हळू सगळ्या सोबत मैत्री होत असते असे सांगितले. मग नंतर रोज कॉलेजला जावू लागली. हळू- हळू माझी सगळ्यांसोबत ओळखी होत गेली. पहिल्या दिवशी असे वाटायच कि, कुठे कोठे आलो आपण. पण आज असे वाटते माझ्या भारती कॉलेज सारखं दुसरा कोणतेच कॉलेज नाही.

---

## एक स्त्री



[illegible] पांडुरंग जाधव
बी. ए. १

स्त्री समाजाचा एक महत्वाचा आणि मौल्यवान असा भाग आहे.

एक स्त्री ही कोणाची आई, तर कोणाची ताई असे अनेक नाते स्त्री जपून ठेवते.

स्त्री ही आपल्या मुला-बाळांची पहिली शिक्षिका म्हणून आस्तित्वात आली आहे. ही एक पहिली शिक्षिका फक्त मुला - बाळांची नसून पूर्ण कुटुंबाची सुध्दा शिक्षिका म्हणून कार्य करीत असते ती आपल्या सोबत कुटूंबातील सर्वांचा सर्वांगीन विकास करीत असते.

भूतकाळात स्त्रीचा प्राथमिक भूमिका गृहिणी म्हणून पाहिली जात असे. आधी स्त्रीयांना शिकण्यांचा अधिकार नव्हता. बाहेर जावून शिकण्याचा असा कोणत्याही प्रकारचा अधिकार स्त्रीयांना नव्हता. स्त्रीया आपल्या जीवनात अनेक संघर्ष करीत होत्या.

पण या बदलत्या काळानुसार स्त्रीयांचा सर्वांगीन विकास होवू लागला. स्त्री हे अवकाशात उंच भरारी होवू लागल्या जसे की सुनीता विल्यम्स, कल्पना चावला सारख्या हेच नव्हे तर पर्वतांच्या उंच टेकडी वरजावून बछेंद्री पाल सारख्या अशा महान स्त्री स्वत: सोबत समाजाचा तसेच देशाचा सुध्दा सर्वांगीन विकास व गौरव करीत आहे.

आणि हे सर्व बदल शक्य झाले आहे. फक्त शिक्षणामुळे असे म्हणतात की स्त्री शिकली प्रगती झाली हे वाक्य खरे ठरले आहे. कुटूंबातील एक स्त्री शिकलेली असेल तर ती कुटूंबासोबत सर्वांचा सर्वांगीन विकास करीत असते.

स्त्री हा असा केंद्र बिंदू आहे. ज्याच्या मुळे हे सर्व जग अस्तित्वात आहे. आजच्या स्त्रीने साध्य करुन दाखविले आहे कि आता ती कोणावरही अवलंबून न राहता स्वावलंबी झाली आहे. स्त्री ह नोकरी, व्यापार, उद्योग क्षेत्रात आपले कर्तुत्व दाखवत आहे.स्त्री हि समाजामध्ये स्वच्छतेचे जागरुकता करणारी स्त्री आज इतर क्षेत्रातही स्वत: सोबत इतरांचा हि सर्वांगीन विकास करीत आहे.

स्त्री म्हणजे एक वाट......
असक्य ते शक्य करुन दाखविणारे
अन्यायाला न्याय मिळवून देणारे
स्वत: सोबत सर्वांचा सर्वांगिण विकास करणारे ।

# गुरु

ज्यांच्या शब्दात ईश्वर असे
त्यांच्या शब्दात निर्मलता दिसे
गुरुजी करतात शुध्द मनाला
त्यांचे उपकार फिटतील कसे
हात छोटा माझा आपल्या हाती धरुन
दिली अक्षर ओळख लाख प्रयत्न करुन
धडा हर एक तुमचा नवा
गुरुजी पटकन ध्यानी बसे
गुरुजी करतात शुध्द मनाला
त्यांचे उपकार फिटतील कसे
लिहणे शिकलो जेव्हा वाचणे शिकलो तेव्हा
हात डोक्यावरी माझ्या, तुमचा हवा
ज्ञान देतात अज्ञानी ला .....
त्यांच्या ज्ञानाला सिमा नसे
गुरुजी करतात शुध्द मनाला
त्यांचे उपकार फिटतील कसे ।

# भ्रूणहत्या

नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे
परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही
त्याच्या जागी तू आहेस कसे तुला कळत नाही
ताईसवे माझ्या मला आनंदाने न्हाऊ दे
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे !

तु बहिण, तू कन्या, तु एक स्त्री आहे
काल जिथे तु होती आज मी तिथे आहे
तु जसे विनले नाते तसे मला विणू दे
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे !

पहा मग फिरुण मी पुन्हा कधी येणार नाही
भाग्य कन्यादानाचे आई तुला देणार नाही
डोळे येता भरुन तुझे पदर मला होऊ दे
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे !

# मी मुलगी बोलते..




कु. करिना संजय राठोड
बी.ए. २

जर नसत्या मुली
तर कोणी पेटविल्या असत्या चुली
माणसाला तर पाहिजे सारच आयतं
भरणीतुन उठून तो घेत नाही रायतं
मुलीला समजु नका छोटी
हनुमंत जन्मला मायच्याच पोटी
उठते माउली बनविते रोटी
खाऊ घालते चिमुकल्यांच्या पोटी
मुलगी म्हणजेच महालक्ष्मी
प्रसन्न झाली तर कोणती कमी
नेहमी राहते आपल्याच कार्या
आवक न जास्त खर्चच कमी
मुलगी देते बापाला साथ
सासऱ्यांनाही मदतीचा हात
फुल नव्हे ती सदाफुली
गर्भातच घेता तिचा जिव
कसे हो तुम्ही तुम्हाला
येत नाही किव ।
मुलीच्या रुपाने अवतरले दुर्गा
धन-धाण्यांनी भरेल तुमचे दर्गा ।
मुलाला पत्नी, सासुला सुन
सांगा आणाल कुठून ?
का भ्रृणहत्या करुन
का घेता निष्पाप बळी
जेव्हा तीची खुलेल पाकळी
आई पाहिजे, पत्नी पाहिजे
ताई पाहिजे, मग मुलगी का नको?
वाचवा तीला वाचवा !
वाचवाल तरच भविष्य घडवाल !



# शेतकरी



आचल बंडुजी डुबुरकार
बी. ए. १

रानात दिवसभर राबतो
तोच आहे खरा राजा,
रानात सोन पीकवतो
शेतकरी माझा.

जगात पोशिंदा म्हणून ओळखला जातो तो शेतकरी शेतात रात्र दिवस कष्ट करुन धान्य पिकवतो. भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतात ८० % लोक शेती करतात. शेतकऱ्याला शेती करण्यासाठी प्रथम सुपीक जमीन आणि पाणी लागते.

भारत अर्थव्यवस्थेला मजबूत करण्याचे काम शेतकरी करतो.

शेतकरी म्हटलं की, आपल्या डोळ्यासमोर गरिबी येते. दुष्काळ, कर्जबाजारी, अनुदानासाठी सरकारवर अवलंबून असणारा शेतकरी जर शेतात पिक झाले नाही तर शेतकरी आत्महत्या सुध्दा करतात. ही परिस्थिती का व कशी निर्माण झाली? ह्याचा शोध घेण्याचा कुणी प्रयत्न केला नाही. शेती हा व्यवसाय पावसावर मुख्यत: हवामानावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे.

पाउस कमी जास्त झाल्यास शेतीवर परिणाम होतो. तसेच पाउस वेळेवर न आल्यास त्याचा सुध्दा शेतीवर परिणाम होतो अशा वेळी शेतकऱ्याची अपेक्षा सरकार कडून अनुदान, कर्जमाफी मिळण्याची असते व ती न मिळाल्यास तो कर्जबाजारी होतो. मग शेतकरी आत्महत्या करण्याचा निर्णय घेतो. शेतकऱ्याला अनेक परिस्थित तोंड द्यावे लागते.

आता शेतीची मशागत करण्यासाठी ट्रॅक्टर व इतर यंत्र आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्याला शेती करण्यासाठी मदत झाली आहे. पाण्यासाठी सरकारने व स्वयंसेवी संस्थांनी मोठ्या प्रमाणात छोटे छोटे बंधारे व धरण बांधली आहेत. आता शेतकरी खुप मोठ्या प्रमाणात ठिंबक सिंचनाचा वापर करीत आहे.

बळीराजा तु घेवू नको फाशी, जग राहील तुझ्यवीन उपाशी .

अर्थशास्त्रज्ञ म्हणतात, व्यापारी लोकांमुळे देश चालतो. पण लॉकडाउन मुळे कळल की, शेतात नांगर चालतो तेव्हा देश चालतो.....
जो पाण्याने अंघोळ करतो,
तो फक्त पोशाख बदलू शकतो,
पण जो घामाने अंघोळ करतो,
तो इतिहास बदलू शकतो... !

शेती ही फार पूरातन काळापासून चालत आलेली आहे. आपले पूर्वज यांच्या विचारातून व युक्तीतून या संकल्पनेचा उगम झाला व तो तसाच चालत आहे. महाराष्ट्रामध्ये शिवाजी महाराजांच्या कालखंडात शेतकऱ्याला खुप महत्त्वाचे स्थान होते. शेतकऱ्यावर शेती अवलंबून आहे. हा शेतकऱ्याचा परिणाम आहे. जो देशातील समृध्दी आणतो. त्यांचे योगदान अमुल्य आहे. ते आपल्या समाजाचे एक महत्त्वाचे सदस्य आहे. दुसऱ्या शब्दात ती जमीन शेतकरी आहे.

शेतकरी कडक उन्हात कष्ट करतो. शेतकरी चांगल्या पीकांची स्वप्नाची खूप काळजी घेतो.

विराट सतरा करोडात गेला
धोनी पंधरा करोडात गेला
जगाचा पोशिंदा मात्र
झाडावर लटकून मेला !!
भारत कृषीप्रधान की क्रीकेटप्रधान
हाच मोठा प्रश्न पडतो
शेतकरी जगला काय
मेला काय
सांगा कुणाला फरक पडतो !!

खेळाडू सारखे
करोडो नको
फक्त पीक मालाला

भाव द्या
कृषीरत्न कृषीभूषण नको
फक्त शेतकऱ्याला
मान द्या !!

काळ्या मातीची
त्याची खान,
राबी तो त्याच्यात
विसरुणी मान.

शेतकरी शेतात बिज पेरते आणि आणि संपूर्ण वर्षभर पिके कापण्यात व्यस्त असतो. शेतकऱ्याचा दिवस सकाळी ताणल्यापासून सुरु होतो आणि दिवस उशीरा संपत असतो. असा आहे आपल्या देशातला शेतकरी.

जय जवान, जय किसान.

## गर्भातील मुलीचे मनोगत




**वैष्णवी राजू पहूळ**
**बी.कॉम.२**


आई तुला कसं सांगू गं मी पोटात असताना किती आनंदात होते, की मलाही जन्म मिळेल हे जग बघायला मिळेल. मी आतमधूनच तुमच्या सर्व गोष्टी ऐकायची त्यामुळे या जगात यायची फारच उत्सुकता वाढली होती. तू जेव्हा दादाला सांगत होतीस आता तुला थोड्याच दिवसात तुझ्याशी खेळायला आणखी एक भाउ येणार आहे तेव्हा मी पोटात खळखळून हसले आणि म्हणाले, आई भाउ नाही छोटी बहीन येणार आहे. पण जेव्हा तुम्ही डॉक्टरांकडे गेले आणि डॉक्टर म्हणाले की मुलगी आहे. त्यानंतर एकदम शांतता पसरली आणि बाबा म्हणाले की सर अर्बोशन करा.

दुसऱ्या दिवशी सकाळी देवाची पूजा करताना तु म्हणालीस देवा, मला नीटपणे जावून सुखरुप येवू दे, मला वाटल की तुझी तब्येत बिघडली असावी, मी पण पाणावलेलया डोळ्यांनी या देवाला म्हणाले की माझ्या आईला लवकर बर कर.... त्यानंतर तुम्ही दवाखान्यात गेले आणि नंतर ..... नंतरच तुला माहितच आहे.

आई का गं मारलस मला? तुला बघायचं होत गं डोळ भरुन आई । तू सुध्दा एक मुलगीच होतीस नां. तू का समजून घेतले नाहीस माझ्या भावनांना, का सांगीतल नाहीस तू बाबांना.

माझी पण ईच्छा होती या सुंदर जगाला बघायची. किती वेदनां झाल्या मला किती जीव माझा आत तडफडला. आई, आई किती आवाज देत होते मी तुला माझा आवाज तुम्ही का ऐकला नाही. मी जन्माला आले असते तर काय बिघडल असतं. तुम्हाला मुलगाच का हवा होता. मुलगी का नाहीं?

म्हातारपणाची काठी, तुमचा आधार स्तंभ झाली असती. आई, असं का केलंस गं ? मी तुम्हाला पाहण्यासाठी किती आशा लावून बसले होते, तुम्ही मला मारुनच टाकल.

'' पापा मुझे भी देखना है
रंग जमाने का
रब का वास्ता है तुम्हें, मौका
तो दो मुझे कायनात मे आने का । ''



## ''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी''




**कु. कल्याणी दारासिंग जाधव**
**बी.ए. २**


''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी ।'' हो मराठी बोलतो किंबहूना ती बोललीही जाते, परंतु, वर्षभरातून फकत एक दिवसच म्हणजे '२७ फेब्रवारी' रोजी हो त्याला कारनही तसेच आहे. अगदी जगभरातील मराठी भाषककांकडून २७ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो.

मराठी कवी विष्णू वामनं शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने हा दिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून पाळण्याची प्रथा सुरु केली. जागतिक मराठी अकादमी ने याकामी पुढाकार घेतला.

कवी कुसुमाग्रह यांच्याबद्दल आजच्या पिढीला ठाऊक नसल्यामुळे कदाचित हाच दिवस, ' मराठी भाषा दिवस' म्हणून का साजरा करायचा असा एक साधा प्रश्न त्यांच्या मनामध्ये कुठेतरी दडलेला असतो. खरतर कवी कुसुमाग्रह यांचा व्यासंग इतका मोठा आहे की त्यांच्याबद्दल काय बोलावे.

विष्णू वामन शिरवाडकर हे एक मराठी कवी, नाटककार व कांदबरीकार होते. त्यांची नटसम्राट, दुसरा पेशवा ही गाजलेली नाटके तसेच कल्पनेच्या तीरावर, जान्हवी या कादंबऱ्या आणि किनारा, विशाखा, मराठी माती हे काव्यसंग्रह, प्रकाशित आहेत.

यापैकी 'विशाखा' हा काव्यसंग्रह आधुनिक मराठी काव्याचे कायमचे भूषण आहे. शिवाय १९६४ मध्ये गोव्याच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपददेखील त्यांनी भूषविले होते. कुसुमाग्रजांना मराठी भाषेतील साहित्याचा 'कोहिनूर' म्हणून ही संबोधले जाते.

अनेक मराठी भाषिक मराठी भाषा दिवस साजरा करतात खरा, परंतु खूप क्वचित जणांनाच हे ठाऊक असेल की, जगभरातील बऱ्याच भाषांचा उगम हा जसा संस्कृत भाषेपासून झाला आहे, तशीच आपली मराठी भाषादेखील सस्कृत भाषेमधून आली आहे.

लहान मूल जेव्हा जन्माला येते तेव्हा आपल्या आईची आपल्या सभोवताली असलेल्या भाषेची त्याला ओळख होते. त्या भाषेचे त्याच्यांवर संस्कार होतात. महाराष्ट्रातील बहुतांश लोकांची मराठी भाषा ही 'मायबोली' आहे. सर्व महाराष्ट्राची मराठी भाषा एक असली तरीही मराठी भाषा दर बारा कोसावर बदलते. प्रत्येक प्रातांची निराळी भाषा आहे. लेखी भाषा तीच, परंतु, बोलीभाषेत फरक जाणवतो. मराठी भाषेतसुध्दा वेगवेगळे प्रकार जाणवतात, जसे की, कोकणची कोकणी भाषा, घाटावरची व देशातील वेगळी भाषा, घाटावरची व देशातील वेगळी भाषा, गोव्याकडची कोकणी भाषा वेगळी असते. मराठी भाषा ही लवचिक आहे.

थोड्या – थोड्या फरकाने ती वेगळी भासते. अलीकडे मराठी भाषा ही शुध्द मराठी भाषा ही शुध्द मराठी भाषा राहिली नाही. त्यामध्ये हिंदी आणि इंग्रजी भाषाही मिश्रित झाली आहे. अनेक खेड्यांमध्ये रोज बोलली जाणारी मराठी भाषा ही जरी अशुध्द आणि रागंडी असली तरी देखल कुठेतरी ती भाषा आपली वाटते.एक आपलेपण जाणवते त्यामध्ये अलीकडे मराठी भाषा बोलली जाते. परंतु, त्यामध्ये हिंदी किंवा इंग्रजी शब्द वापरले जातात. तरुण पिढी मोठ्या प्रमाणात इंग्रजी भाषेकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे उच्च शिक्षणासाठी हे लोक परदेशात जातात आणि त्या देशातील बोलीभाषेलाच आपली मातृभाषा समजून अगदी माय-देशी परतल्यावर ही त्यांचा सर्रास वापर करतात.

कुठेतरी इंग्रजी भाषेचे वर्चस्व मराठी भाषेवर प्रस्थापित झालेले दिसून येते. त्यामुळेच आज समाजामध्ये मराठी भाषेला प्रतिष्ठित भाषेचा दर्जा अजूनही मिळाला नाही. मराठी

पूर्वजांकडून प्राप्त झाली आहे. मराठी भाषा अर्थाने आपल्या महाराष्ट्राची ओळख आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आज महाराष्ट्राला मराठी साहित्याला खुप मोठा इतिहास आहे. याच मराठी भाषेने आपल्याला कुसुमाग्रज, बा.भ. बोरकर, शांता शेळके, केशवसुत यासारखे अनेक कवी, वि. स. खांडेकर, प्र.के. अत्रे यांच्यासारखे लेखक मराठी साहित्य खुप मोठे आहे. त्याची ओळख करुन घेणे व आजच्या पिढीला ओळख करुन देणे गरजेचे होत चालले आहे. केवळ आपल्या बोलण्यातून नव्हे तर आपल्या आचरणातून आणि विचारांमधून देखील मराठी भाषा दिसायला हवी.

तरचं मराठी भाषा खऱ्या अर्थाने समृध्द होईल आणि ही जबाबदारी आजच्या तरुण पिढीची आहे. तरुण पिढी परदेशात उच्च शिक्षणासाठी जाते. तिथे जावून त्यांनी तिथली बोलीभाषा जरुर शिकून घ्यावी, परंतु आपली मायबोली मराठी भाषा ही बोलावी जेणेकरुन ती समृध्द होईल. परदेशातून परत येतांना मराठी भाषेचा विसर पडता कामा नये.

ने मजसी ने तु परत मातृभूमीला
सागरा प्राण तळमळला सागरा !

असे म्हणणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचा हा देश आहे. परदेशी जावून ही आपली मायबोली, मराठी भाषा आणि आपल्या या महाराष्ट्राने आपल्याला दिले आहेत. म्हणूनच मराठी भाषेचा जागर करुन तिचे संवर्धन करुन तिला पुन्हा एकदा समानामध्ये प्रतिष्ठित भाषेचा दर्जा मिळवून देण्याची नैतिक जबाबदारी आता आपली आहे.

उठा चला, उठा चला, जागर करुया स मराठी आमुची
मायबोली मराठी आमुची शान.
एकसुराने गाउया त्याचे गुणगान !!







# हिंदी विभाग

# गुलजार: हिंदी साहित्य के मनमौजी

वैशाली एस. राठोड
बी. ए. ३

गुलजार हिन्दी फिल्मों के प्रसिद्ध गीतकार हैं। जीवन के हर पेअसंग को व्यक्त करने वाली इनकी कविता हम सबको मोहित करती है. वे प्रसिद्ध कवी तो हैहि पर इसके अतिरिक्त वे एक पटकथा लेखक, फ़िल्म निर्देशक नाटककार तथा प्रसिद्ध शायर हैं। उनकी रचनाएँ मुख्यतः हिन्दी, पंजाबी तथा उर्दू में हैं, परन्तु ब्रज खड़ी बोली, मारवाडी और हरियाणवी में भी गुलजार रचनाएँ प्रसिद्ध है। कि गुलजार जिनका सम्पूर्ण सिंह कालरा है. उन्होंने गुलज़ार नामसे अपना साहित्य लिखा है. गुलज़ार नाम का मतलब गुलाब उद्यान, बसे हुए, शहर, उत्कर्ष होता है।

गुलज़ार का जन्म पाकिस्तान के जिला पंजाब के दीना गाँव में, १८ अगस्त १९३६ को हुआ था। वो अपने पिता की इकलौती संतान हैं। उनकी माँ उन्हें बचपन में ही छोड़ कर चल बसीं। माँ के आँचल की छाँव और पिता का दुलार भी नहीं मिला। वह नौ भाई-बहन में चौथे नंबर पर थे। बंटवारे के बाद उनका परिवार भारत मे अमृतसर आकर बस गया.

कुछ समय बाद अपनी खुद कि पहचान बनणे के लिये गुलज़ार मुंबई चले गये। वहा एक गैरेज में वे मेकेनिक का काम करने लगे और जबभी कामसे फुर्सत मिले तब कवितायें लिखने लगे। गुलजार साहब कि की रचनाएं दिलों को छु लेती है. फ़िल्म इंडस्ट्री में उन्होंने बिमल राय, ह्रषिकेश मुखर्जी और हेमंत कुमार के सहारे काम शुरू किया।

बिमल राय की फ़िल्म बन्दिनी के लिए गुलज़ार ने अपना पहला गीत लिखा। गुलजार ने १९७१ में मेरे अपने ये फिल्म निर्देशित की. उन्होंने आशीर्वा आनन्द, खामोशी और अन्य जैसी फिल्मों के लिए संव और पटकथा लिखी थी। इस फिल्म में मीना कुमारी आनंदी देवी की प्रमुख भूमिका निभाई, जो एक बुढी वि है जो बेरोजगारों और पीड़ित युवाओं की स्थानीय झग के बीच गिर जाती है। एक झगड़े में आनंदी देवी की के कारण उन्हें पता चलता है कि हिंसा कैसे व्यर्थ है।

१९७२ में आयी फिल्म कोशिश जो गूंगे बहरे दम्पति के जीवन पर आधारित कहानी थी, आलोचकों को भी हैरान कर दिया। संजीव कुमार को फ़िल्म के लिए राष्ट्रीय फ़िल्म पुरस्कार सर्वश्रेष्ठ अभिने पुरस्कार मिला। इसके बाद गुलजार ने संजीव कुमार साथ आंधी (१९७५) मौसम (१९७५), अंगूर (१९८ और नमकीन (१९८२) जैसी फिल्मे निर्देशित की।

गुलज़ार को वर्ष सहित्य अकादमी पुरस्क और भारत सरकार द्वारा दिया जाने वाला तीसरे सर नागरिक सम्मान पद्म भूषण से भी सम्मानित किया चुका है। फिल्म स्लम्डाग मिलियनेयर में उनके द्वारा लि गीत जय हो जिसे ए. आर. रहेमान ने संगीत दिया था गीत के लिये उन्हें सर्वश्रेष्ठ गीत का ऑस्कर पुरस्कार उन्हें ग्रैमी पुरस्कार से भी सम्मानित किया जा चुका

हिंदी साहित्य के इस महान साहित्य ने हम सब लोगोको जीवन कि कई रूप, कई छ अपने काव्य, फिल्म और उपन्यासो द्वारा दिखाकर ह जीवन को परिपूर्ण और संपन्न बनाया है. भविष्य मे गुल साहब ऐसेही लिखते रहे ऐसी शुभकामना.



# महिला सुरक्षा: गंभीर समस्या

राजश्री पवार
बी.ए. ३

हमारे देश कि आधी प्रजा महिला है. विकास के हर कार्यक्षेत्र मे महिलाओं का योगदान बढ़ता चला जा रहा है. उनके बिना हमारे देश की उन्नति नहीं हो सकती, आजकल महिलाओं की स्थिति दयनीय होती जा रही है. पुरुष तथा समाज में पुरुष और महिलाओं में किए जाने वाले भेदभाव यह महिलाओं की गिरती स्थितिका एक महत्वपूर्ण कारण है. नारी सुरक्षा की और हम सभी को अग्रसर होना चाहिए, नारी हमारे देश की उन्नति की प्रमुख शिखर होती है।

आजकल महिलाओं तथा लड़कियों के साथ बहुत ही अत्याचार और दुर्व्यवहार किया जा रहा है. घर घर में समाज में खुले आम महिलओंका उत्पीडन होता है. ऐसा आपको हर रोज न्यूज़पेपर, और टीवी पर देखने को मिलता है, सरकार ने नारी सुरक्षा के लिए कई प्रकार के नियम बनाए हैं लेकिन आज भी भारत में लड़कियां सुरक्षित नहीं है।

कहीं बेटियों के साथ अत्याचार हो रहे है तो कहीं ससुराल में बहूबेटीयो पर अत्याचार किया जा रहा है, हमारा देश चाहे जितना भी तरक्की कर ले लेकिन बेटियों की सुरक्षा में कोई सुधार नहीं हो रहा है, जहां बेटियां तथा महिलाएं सुरक्षित नहीं है वह देश आगे नहीं बढ़ सकता है।

हमारे भारत देश में नारियों की सुरक्षा के लिए विभिन्न प्रकार के नियम और कानून बनाए गए हैं जिनका हम सभी को पालन करना चाहिए, और सभी लोगों को भी नारी सुरक्षा के प्रति जागरूक करना चाहिए।

महिलाओं के शिक्षा पर विशेष बल देना चाहिए, क्योंकि महिलाएं शिक्षित होंगी तभी वे अपना रक्षा कर सकेंगी, हम सभी का कर्तव्य है महिलाओं पर हो रहे अत्याचारों के प्रति विरोध और महिलाओं की सुरक्षा करना।

# सोहर



सुनयना अजय केशरवाणी
बी.कॉम.२ (सेमी ४)

संतान के लिए दम्पत्ति का शिव से प्रार्थना करना.

तुं राजा जाएवा सिवपुरी सिवाही मताये ।
राजा हम धनि खोरिया, बरहबै कबहूँ सिव पलिझें ।। १ ।।
जरी जाय पथरे मुरति अबहूँ न पसीजै ।
एतना जँचाति राजाद्वारे बहूत कुछ पउती ।। २ ।।
बहर बरिस सिप पुजलैं त सिव उठी बोलैलै,
राजा कौन संकट तुहरे जियरा के हमहि निति
पुजाला ।। ३ ।।

रक्मिनी अन्न जे त्यागोली जल नाही पीयें ।
सिव तुहरे परतजेलिन परान त एकरे
संतति बिनु ।। ४ ।।

जादु राजा घर अपने त अपने महल के राजा ।
राजा आजू से मास गानि राखेव नवऐ पुत्र होइ हैं ।। ५ ।।

**शब्दार्थ** :- १. रास्ता - २. प्रसन्न होणा ३. माँगती
४. त्यागती है ।।।

**अर्थ** :- संतानहीत नायीका अपने पति से कहती है कि हे राजा, हम दोनो शिव की नगरी चलें वहाँ पर तुम शिव को आराधनाकरना और मै वहाँ शिव जी के दर्शन के लिए आने वाले लोगों के लिए रास्ता साफ करुंगी हमारे इस प्रकार की मेवा से कभी कभी शिवजी अवश्य प्रसन्न होंगे ।। १ ।। वर्षो तक शिव उपासना के बाद नायिका दुःखी हो कर कमहती है कि यह पत्थर की मुर्ती नष्ट हो जाए जो की अब तक हमारी उपासना से प्रसन्न नही हो रही है यदि मै राजा दरबार में इतनी याचना करती तो बहुत कुछ पाती ।। २ ।। बाराह वर्ष के बाद शिव जी दर्शन देकर दुछते है की राजा तुम्हें कौन सा दुःख है जो मेरी उपासना कर रहे हो ।। ३ ।। राजा कहते हैं मेरी राणी रुक्मिणी एक संतान की लालसा में अन्न पाणी त्याग करके आपकी पुजा कर रही है, और अब आशाहीन होकर अपणे प्राण को त्याग रही है ।। ४ ।। शिव प्रसन्न होकर कहतें हैं की राजा तुम आपणे घर जाओ और आज से नै मारा के बाद तुमको और तुम्हारी राणी को एक पत्र की प्राप्ती होगी और तुम्हारा परिवार पुरा होगा ।। ५ ।।





# बिछडे तो ना जी पायेंगे



वैष्णवी राजेंद्र माळेदे
बी.कॉम.२

तुम्हारे संग बिताना चाहती थी
जींदगी पुरी
अब क्यो आ गई दोस्त
तेरे मेरे बिचमे ये दूरी
तेरी दोस्ती के खातीर

मे जिती थी सदा
तुने छोड दिया मेरा साथ
अब मे किससे करुंगी
अपने दिल की बात ।।

किस्से सुनाया करती थी तु खुदके
क्या मिला तुझको बिछडकर मुझसे ?
साथ ही छोडना था तो
ऐसा क्यो किया
पेहले दोस्ती का विश्वास क्यो दिया
स्कूल मे हो या हो कॉलेज में,
रहे थे रहेंगे साथ
अब तुम क्यो नही कर रही हो
मुझसे बात ?
बिछडे तो ना जि पायेंगे
ऐसे थे हम केहते
मेरे बिना तुम अकेले कैसे हो रहते
तेरी मेरी दोस्ती नही थी कमजोर
अब भी है हमारे दि मे
एक जुडी हूई डोर

ये ऐसा धागा है
जो कभी नही टुटेंगा
एक कहती हू यार तेरा मेरा साथ
कभी नही छुटेंगा ।।
Friendlist से अगर निकाल दिया
फिर भी रहूँगी दिल मे
जब भी याद आये एक आवाज देना
जरुर आउंगी तुमसे मिलने

# नारी

अंकुश वनवे
बी. कॉम ३

आंगन की मुस्कान है नारी, फुलोंसे कोमल है नारी । अपनी ज़िद पर आ जाए तो चमकती बिजली है नारी घर का चिराग बनकर दमकती है नारी वक्त आने पर घर का परचम लहरती है नारी जब, प्रतिज्ञा का भी प्रतीक है नारी। धरती का सम्मान है नारी,
देवी का अवतार है नारी।



# इंग्रजी विभाग



## Maria Lumbreras

**Spring and Durum wheat Breeder Assistant at Groupe Limabrain in Spain**

**Jagruti Pramod Kauslkar**
**B.Sc. III (VI Sem)**

After studying agronomical engineering at the University of sevilla and SLU university in Sweden, Maria worked for on year inthe Genertics, Genomics and Breeding department in East Malling Reserch (UK), Supporting different crops and projects as "The development of the genetic map of two parentallines of strawberry'.



In 2013, Maria joined the Limagrain Group working for the ceralR & D department as assistance breeder and she has been recently promoted to Bread & Durum Wheat Breeder. In her new role, Maria is implementing the latest breeding methods to guarants the flow of new, improved and adapted varieties in line with the need of the market. The breeding program, based in Eordooa, develops varieties for all the mediterraneam area and has become market leader for spring and Durum Wheat.

## Village Life



**Madhuri Vinod Chavhan**
**B.A. I**

* Life of the village is full of contentment and happiness as people aren't in a hurry always unline city life.
* There hae hardly been any facilities of irrigation electricity fertilizers seeds care of the livestock.
* Village and villagers have to be freed from age-old superstition and raised up to a respectable level
* Life in the village is very simple and the majority of people are involved in furming during day time

## The Life



**Pranav Bhojraj Jadhao**
**B.A. II**

The life is for beautiful
Enjoy every moment in your life

Enjoy every moment in your life
Enjoy small small movement in your life.

Life is sucess, achieve it
life is failure, don't think bad
go ahead.

Life is happiness, enjoy it
Life is Dark. find the right way.





युवा महोत्सव



शैक्षणिक सहल




प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद



वनविभाग पुरस्कार



युवक दिन



पुरस्कार वितरण

माजी विद्यार्थी मेळावा





मराठी भाषा संवर्धन

उपकुलसचिव कोल्हापुर विद्यापीठ
माजी विद्यार्थी





राष्ट्रीय सेवा योजना शिबीर